चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : cybercell.chandrapur@mahapolice.gov.in

२८जुन, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: (PRO)

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या आरोपीस १० वर्ष सक्त मजुरीची शिक्षा

पोलीस स्टेशन सिंदेवाही अंतर्गत अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या आरोपीस दिनांक २८/०६/२०१९ रोजी **कोर्ट विद्यमान श्री. स.ज. अन्सारी, जिल्हा न्यायाधीश २, चंद्रपूर यांनी शिक्षा** ठोठावली आहे.

हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक: १४/०८/२०१६ रोजी दुपारी २ वाजता दरम्यान यातील फिर्यादी यांची पिडीत मुलगी हीला आरोपी नामे नागेश कवडू नन्नावरे वय ३० वर्ष रा. जामसाडा ता. सिंदेवाही याने त्याचे घरी बोलावुन तीचेवर बलात्कार केला. रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन सिंदेवाही येथे अपराध क्रं. २१७/२०१६ कलम ३७६ (२), आय भादंवि सह कलम ३ (ब) ४ पोक्सो कायदयाप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पोउपनि अमोल सांगडे यांनी पुर्ण करुन आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासुन योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक २८/०६/२०१९ रोजी आरोपी नामे नागेश कवडू नन्नावरे वय ३० वर्ष यास कलम ३७६ (२), आय भादंवि सह कलम ३ (ब) ४ पोक्सो कायदयाप्रमाणे गुन्हा सिध्द झाल्याने १० वर्ष सक्त मजुरी व ६००० रू. दंड, दंड न भरल्यास १ वर्ष सजा, याप्रमाणे **श्री. स.ज. अन्सारी, जिल्हा व सत्र न्यायाधीश २, चंद्रपुर यांनी शिक्षा** सुनावली आहे.

सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. देवेंद्र महाजन, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** यांनी व पैरवी अधिकारी म्हणुन सहा. फौजदार रमेश मुक्कावार पोस्टे सिंदेवाही यांनी काम पाहीले.

---------------------------------------------------------------------------